मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या लोकअदालतीत 5 कोटींची थकबाकी वसूल

## आकुर्डीतील दिवाणी व फौजदारी न्यायालयासह आठही क्षेत्रीय कार्यालयात लोकअदालत

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिकेच्या वतीने थकीत पाणीपट्टी आणि मालमत्ता कराच्या वसुलीसाठी राष्ट्रीय लोकअदालत आयोजित केली होती. त्यात पाच कोटींची थकबाकी वसूल झाली. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष व आकुर्डी दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत झाली.

महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत पाणीपट्टी व मालमत्ता कर थकबाकीदारांना ऑनलाइन नोटिसा पाठवल्या होत्या. लोकअदालतीमध्ये पाणीपट्टी आणि मालमत्ता कराशी संबंधित एकूण ३ हजार ४२४ प्रकरणे निकाली निघाली असून, तब्बल ५ कोटी १४ लाख १६० रुपयांचा महसूल मिळाला.




**थकबाकीदारांकडून झालेली वसुली**

२ हजार ४८१ पाणीपट्टी थकबाकीदारांकडून ३ कोटी १४ लाख १९ हजार रुपयांचा कर वसूल.

९४३ मालमत्ता कर थकबाकीदारांकडून २ कोटी २ हजार रुपयांचा मालमत्ता कर संकलित.

यामध्ये ८३४ मालमत्ताधारकांनी ऑनलाइन स्वरूपात मालमत्ता कर भरून ४ टक्के सवलतीचा लाभ.

'अ' प्रभागातील पाणीपट्टी थकबाकीदारांसाठी आकुर्डी फौजदारी व दिवाणी न्यायालय व क्षेत्रीय कार्यालयात आयोजन.

इतर प्रभागातील मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी कर संकलन विभागीय कार्यालय या ठिकाणी लोकअदालतीचे आयोजन.

या लोकअदालतीसाठी थकबाकीदारांना थकबाकी ऑनलाइन पद्धतीने तसेच जवळच्या विभागीय कार्यालयात / क्षेत्रीय कार्यालयात भरण्याची सुविधा.

> " लोकअदालतीत मालमत्ता कराची मोठ्या प्रमाणावर थकबाकी वसूल झाली असून, महापालिकेच्या महसुलात मोठी वाढ करण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम खूप महत्त्वाचे ठरतात. यापुढेही प्रत्येक थकबाकीदारापर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही अधिक प्रभावी मोहिमा राबवणार आहोत. तसेच वारंवार संधी देऊनही थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# एसएसटी श्री सिद्धविनायक वडापाव सेंटर मध्ये चोरी

**पिंपरी | प्रतिनीधी**

डिलक्स चौकातील हॉटेल एसएसटी श्री सिद्धविनायक वडापाव सेंटर मध्ये चोरी झाली. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी मंगळवारी (दि. 26) भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 331(4), 305, 3(5) कलमान्वये अकरांवर गुन्हा नोंदवला आहे. हा प्रकार 25 ऑगस्ट 2025 रोजी पहाटे घडला.

1) संजय मनोहर पवार 2) दत्ता मनोहर पवार 3) शुभम संजय पवार 4) मुन्ना संजय पवार (5) संतोष चव्हाण 6) हेंमत दत्ता पवार सर्व राहणार काळेवाडी 7) उमेश मधुरे रा. रुपी नगर निगडी 8) अमर सोमेश्वर लाड रा. मोशीगाव 9) मयुर (पूर्ण नाव माहीत नाही) रा. जाधववाडी, चिखली 10) प्रदीप यादव रा. जाधववाडी, चिखली व 11) मनोज मधुरे रा. चिंचवड स्टेशनपुणे अशी संशयित आरोपीची नावे आहेत. याबाबत अजीमुद्दीन निजामुद्दीन अन्सारी (रा. मल्हारगड, बी-16, सेक्टर 12, मोशी प्राधिकरण) यांनी फिर्याद दिली.

मात्र, संशयित आरोपींनी दिनांक 25/08/2025 रोजी रात्री 02/30 वा. सुमारास वरील अ.क्र. 1 ते 11 या सर्वांनी मिळुन फिर्यादी याच्या दुकानात कोणीही नाहीत हे माहित असतानाही दुकानाचे कुलुप तोडुन आतमध्येप्रवेश करुन खालीलप्रमाणे-अंदाजे किंमत 12,00,000/- रुपये 1) स्टील कांऊटर, 2) हॉट केस 3) 10 नग एलईडी टिव्ही 32 इंच चे, 4) 2 नग तांदूळ दळायचे ग्राइंन्डर मशीन, 5) 3 नग चटणी बनवायचे ग्राइंन्डर मशीन, 6) 9 नग सी.पी. प्लस कंपनीचे कॅमेरे व 1 नग डिव्हीआर, 7) चिमणी, 8) 2 नग सिलींग फॅन, 9) 2 बॅटरी व 1 नग इन्वेटर, 10) 3 नग स्टीलचे टेबल, 11) 6 नग स्टीलचे लहान बाकडे, 12) 1 नग स्टीलचा मोठा बाकड,




13) 2 नग लहान लोखंडी बाकडे, 14) 2 नग लहान लोखंडी बाकडे, 15) 1 नग मोठे बाकड 16) डोसा बनविण्याचे बट्टी, 17) 8 बाय 24 चे रोलींग शटर, 18) थंड पाण्याचे कुलर, 19) कुलर फॅन, 20) कंप्यूटर बिलींग मशीन, 21) सामानाने भरलेली कोका कोला कंपनीचा फ्रिज, 22) सामानाने भरलेली पेप्सी कंपनीचे सिंगल डोअर फ्रिज, 23) सामानाने भरलेली पेप्सी कंपनीचे डबल डोअर फ्रिज, 24) बटाटा सोलायचे मशीन, 25) तीन खुच्र्या, 26) बिसलरी पाण्याचे 25 बॉक्स, 27) 8 पोते बटाटा, 28) 2 पोते कांदा, 29) दुकानातील इतर किराणा समान, 30) दुकानातील भांडे, 31) स्टीलचे दोन मोठे बट्टी व 32) एक श्री सिध्दीविनायक वडापाव नावाचा दुकानाचा बोर्ड इत्यादी साहित्य चोरीला गेल्यानंतर संशयित आरोपी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आली, अद्याप कोणत्याही आरोपींना अटक करण्यात आली नाही.

# ‘राष्ट्रीय स्वेच्छिक रक्तदान’ सेवा पखवाडा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 80 जणांचे रक्तदान, 368 नागरिकांनी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणीचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या अधिसूचनेनुसार राष्ट्रीय स्वेच्छिक रक्तदान सेवा पखवाडा साजरा करण्यात आला. शहरवासीयांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देत ८० नागरिकांनी रक्तदान केले असून ३६८ नागरिकांनी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणीचा लाभ घेतला आहे.

या उपक्रमासाठी वाय.सी.एम. रुग्णालयाच्या रक्तकेंद्रामार्फत विविध ठिकाणी रक्तदान, हिमोग्लोबिन चाचणी व रक्तगट तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. तसेच स्वेच्छिक रक्तदान व अवयवदान करण्याची शपथ देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या अभियानाला अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, पदवीत्तर संस्था वाय.सी.एम. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. तुषार पाटील, वाय.सी.एम. रुग्णालय नोडल ऑफिसर डॉ. छाया शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उज्वला अंदुरकर, डॉ. मीनाक्षी सूर्यवंशी, डॉ. शैलजा भावसार, डॉ. मीना सोनवणे, डॉ. नीता घाडगे, डॉ. हर्षदा बाविस्कर तसेच रक्तकेंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

यावेळी अधिकाधिक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान व अवयवदान करावे तसेच महापालिकेतर्फे राबविण्यात येत असलेल्या ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय विभागाच्या वतीने करण्यात आले.




> रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. या उपक्रमातून नागरिकांनी मोठ्या संख्येने पुढाकार घेऊन रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरात सहभाग नोंदवला ही आनंदाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्याविषयी जागरूकता वाढते आणि आरोग्यदायी पिढी घडण्यास मदत होते.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे यांचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असून या घटकांचे सर्वांगीण कल्याण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत, असे निर्देश महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे यांनी दिले.



महाराष्ट्र विधानमंडळाची अनुसूचित जाती कल्याण समिती पुणे जिल्हा दौऱ्यावर आहे. आज या समितीची पिंपरी चिंचवड महापालिकेत बैठक पार पडली. यावेळी आमदार अमित गोरखे,भीमराव केराम, तानाजी मुटकुळे, शाम खोंडे, सचिन पाटील, गजानन लवटे, संजय मेश्राम, डॉ. प्रज्ञा सातव, जगन्नाथ अभ्यंकर यांच्यासह विधानमंडळ सचिवालयाचे सहसचिव सुभाष नलावडे, अवर सचिव सीमा तांबे, कक्ष अधिकारी राहुल लिंगरवार, समिती प्रमुख यांचे स्वीय सहाय्यक रणजित गमरे, सहाय्यक कक्ष अधिकारी संदीप माने, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता अनिल भालसाखळे, अजय सुर्यवंशी, देवन्ना गट्टुवार, माणिक चव्हाण, उपायुक्त सचिन पवार, सिताराम बहुरे, राजेश आगळे, संदीप खोत, ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, किरणकुमार मोरे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त कीर्ती नलावडे, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांच्यासह कामगार नेते गणेश भोसले, तुकाराम गायकवाड, संजय जगदाळे, अविनाश ढमाले, परशुराम कदम, अविनाश इंगवले तसेच पिंपरी चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनातील समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद आदींचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत महापालिकेतील अनुसूचित जातींच्या प्रवर्गातील कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबत समिती सदस्यांनी माहिती घेऊन त्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे म्हणाले, प्रशासनातील सर्व योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करून अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी असलेल्या योजना आणि प्रशासकीय लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतील यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. महापालिकेच्या स्तरावर अनुसूचित जातींसाठी विविध योजना आखण्यात येतात. त्यासाठी स्वतंत्र निधीची देखील तरतूद केली जात असते. हा निधी केवळ अनुसूचित जातीसाठी असलेल्या संबंधित योजनेसाठी वापरावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख कुचे म्हणाले, सफाई कर्मचारी यांच्याबाबत निर्णय घेताना माणुसकीच्या भावनेतून विचार करण्याची गरज आहे. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात यावीत. त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सफाई कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क देण्यात यावेत. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित असणारे प्रश्न तातडीने सोडवावेत, असेही ते म्हणाले.

# महापालिकेचे अधिकारी आता रस्त्यांवर

## नागरी समस्या सोडविण्यासाठी नवीन कार्यपद्धती; महापालिका आयुक्तही नागरिकांची भेटी घेणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवर होणारी अतिक्रमणे, जागोजागी पडलेले खड्डे, तुंबलेली गटारे यासह नागरिकांना भेडसावणाऱ्या अन्य समस्यांची जाणीव अधिकाऱ्यांना व्हावी, यासाठी अधिकाऱ्यांनी आता थेट रस्त्यांवर उतरण्याचा आदेश महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिले आहेत. काही ठिकाणी महापालिका आयुक्त हे स्वत: भेट देणार आहेत. या पद्धतीने कामकाज करण्यासाठी महापालिका प्रशासनाने नियोजन केले आहे. त्यामध्ये पथ, अतिक्रमण, मलनिस्सारण यांच्यासह महत्त्वाच्या विभागांचा समावेश असणार आहे.



शहरातील विविध भागांतील नागरिकांना दररोज नवीन प्रश्नांना सामोरे जावे लागते. गेल्या काही दिवसांपासून शहरात झालेल्या पावसामुळे महापालिकेच्या पथ विभागाने केलेल्या कामाची गुणवत्ता समोर आली आहे. मुख्य रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे त्यामधून वाहन चालविताना नागरिकांची आणि वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. पावसाचे पाणी वाहून न जाता रस्त्यावरच साचून राहत असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

रस्ते, पदपथांवर विक्रेते, दुकानदार अतिक्रमण करत असल्याने पादचाऱ्यांना त्रास होत आहे. काही भागात दुकानांचे साहित्य थेट रस्त्यावर ठेवल्याने रस्ते अरुंद बनले आहेत. याबाबतच्या तक्रारी नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत. याची दखल घेत महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी संबंधित विभागातील अधिकारी, कर्मचारी यांना आवश्यक त्या सूचनाही केल्या होत्या.

मात्र याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर अभियंता, अधीक्षक अभियंता यांना नागरिकांच्या अडचणी, प्रश्न समजावेत, यासाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून पाहणी करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिल्या आहेत.

'पुढील काही दिवसांत महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी यांच्यासह उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त प्रत्यक्ष शहरातील विविध भागांत फिरून प्रश्न जाणून घेणार आहेत. त्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये पथ, अतिक्रमण, मलनिस्सारण यांच्यासह इतर महत्त्वाच्या विभागांचा समावेश असणार आहे,' असे आयुक्त राम यांनी सांगितले.

> “ स्थानिक पातळीवर येणाऱ्या समस्या, अडचणी यांची जाणीव संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना व्हावी, त्यासाठी प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाणे आवश्यक आहे. यासाठी सर्व अधिकारी रस्त्यावर उतरून पाहणी करणार आहेत. महापालिका आयुक्त म्हणून स्वत: यामध्ये सहभागी होणार आहे. त्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागतील.
>
> **- नवलकिशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.**

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोत सर्व महिला लोकोपायलट

## पुणे मेट्रोच्या हिंजवडी-शिवाजीनगर मार्गावर व्यवस्थापनासाठी फ्रान्सच्या केओलिस कंपनीची निवड

**पुणे | प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या (मार्गिका क्रमांक ३) व्यवस्थापनाची जबाबदारी फ्रान्सच्या केओलिस कंपनीला देण्यात आली आहे. 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण' (पीएमआरडीए), 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' (पीआयटीसीएमआरएल) यांनी या फ्रेंच कंपनीबरोबर पुढील दहा वर्षांसाठी करार केला आहे. या मार्गावर २२ अल्स्टॉम-निर्मित मेट्रो गाड्या चालवल्या जाणार असून, केओलिस कंपनी या गाड्यांचे व्यवस्थापन, तिकीट प्रणाली आणि सर्व स्थानकांचे नियोजन करणार आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर हा २३ किलोमीटर लांबीचा मेट्रो प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राबवला जात आहे. या मार्गाचे जवळपास ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. नववर्षात (मार्च २०२६) या मार्गावरील मेट्रो प्रत्यक्षात सुरू करण्याचे उद्दिष्ट 'पीएमआरडीए'ने ठेवले असून, त्या दृष्टीने दोन ते तीन चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. या मार्गावर टप्प्याटप्प्याने एक पाऊल पुढे पडत असून, २३ स्थानकांची दुरुस्ती अंतिम टप्प्यात असल्याचे 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.



शहरातील 'पीपीपी' तत्त्वावर विकसित करण्यात आलेला हा एकमेव मेट्रो मार्ग असून, मार्गिकेच्या उभारणीसाठी ८,३१३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी खासगी गुंतवणूक १,३१५ कोटी रुपये, संस्थात्मक कर्ज ४,७८९ कोटी रुपये, केंद्र सरकारचा व्यवहार्यता अंतर निधी (गॅप फंडिंग) १,२२४.८ कोटी रुपये आणि राज्य सरकारचे योगदान ९०.५८ कोटी रुपये असे निश्चित करण्यात आले आहे.

'हा मार्ग पुण्यातील 'आयटी हब' असलेल्या हिंजवडी आणि शहराच्या मध्यवर्ती भागातील शिवाजीनगर यांना जोडणारा आहे. यामुळे विशेषतः हिंजवडीतील आयटी व्यावसायिकांना आणि इतर दैनंदिन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. तसेच, वाहतूक कोंडीतून सुटका होण्याबरोबरच प्रवासाचा वेळही कमी होण्यास मदत होणार आहे,' अशी माहिती 'पीएमआरडीए'च्या मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी दिली.

### मेट्रोत सर्व महिला लोकोपायलट

» या प्रकल्पात एक उल्लेखनीय पाऊल म्हणून 'केओलिस'ने सर्व महिला मेट्रो चालक संघाची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मार्गावरील मेट्रो चालवण्यासाठी संपूर्णपणे महिला चालकांचा समावेश असेल. यामुळे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल गाठले जाणार आहे. तसेच, या निर्णयामुळे महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि मेट्रो सेवेत त्यांचा सहभाग वाढेल.

# ह्युंदाईकडून पुण्यात तब्बल 11 हजार कोटींची गुंतवणूक!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ह्युंदाईने पुण्यात वाढीव गुंतवणूक करण्याची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

ह्युंदाई मोटार इंडिया लिमिटेड कंपनीने तळेगावमध्ये मोटारनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी सात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आधी केली होती. आता कंपनीने ही गुंतवणूक वाढवून ११ हजार कोटी रुपयांवर नेली आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक उन्सू किम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर केला. या प्रकल्पाच्या माध्यमातून ७ हजार ६०० प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत.

ह्युंदाई कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक उन्सू किम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची१५ सप्टेंबरला भेट घेतली. त्यानंतर कंपनीच्या शिष्टमंडळासोबत वर्षा निवासस्थानी त्यांनी बैठक घेतली. या बैठकीत फडणवीस म्हणाले,‘वाहन उद्योगात ह्युंदाई कंपनीचे मोठे नाव आहे. कंपनीने राज्यातही गुंतवणूक केली आहे. पुण्यातील प्रकल्पातून वाहन उत्पादनात वाढ होणार आहे.

कंपनीने राज्यात वाहन उद्योगात अधिकाधिक गुंतवणूक करून रोजगारनिर्मितीत वाढ करावी. कंपनी राज्यात सामाजिक उत्तरदायित्वांतर्गत विविध कामांसाठी ५६ कोटी रुपयांचा निधी देत आहे. ही बाब स्तुत्य असून, या निधीतून राज्यात सुरू असलेली कामे पथदर्शी ठरतील. राज्यात उद्योगस्नेही वातावरण तयार करून उद्योगांना सहकार्य करण्याची राज्य शासनाची भूमिका आहे.’

मुख्यमंत्र्यांनी आवाहन केल्यानंतर ह्युंदाईचे व्यवस्थापकीय संचालक उन्सू किम यांनी कंपनीची पुण्यातील तळेगाव प्रकल्पातील गुंतवणूक वाढविण्याची घोषणा केली. ह्युंदाई मोटर इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, ‘महाराष्ट्रात कंपनीकडून गुंतवणुकीत वाढ केली जात आहे. कंपनीच्या दीर्घकालीन धोरणाचा हा भाग आहे.



कंपनीने आता तळेगाव प्रकल्पातील गुंतवणूक सात हजार कोटींवरून ११ हजार कोटी रुपयांवर नेली आहे. यामुळे कंपनीच्या प्रकल्पाची उत्पादनक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ७ हजार ६०० प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. याचबरोबर अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. यातून या परिसरातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.’

> “तळेगाव प्रकल्पातील वाढीव गुंतवणुकीचा वापर प्रामुख्याने अत्याधुनिक निर्मिती तंत्रज्ञान, सेव्हन्थ जनरेशन पेंट शॉप, ऑटोमेशन टूल्स, पायाभूत सुविधा अद्ययावत करणे आणि ई-वाहननिर्मितीसाठी सज्जता यासाठी होणार आहे. तळेगावमधील प्रकल्पातून देशांतर्गत, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी मोटारींची निर्मिती केली जाणार आहे.
>
> – प्रवक्ता, ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड.

# सोलापूरहून मुंबई, बेंगळुरुसाठी 15 ऑक्टोबरपासून हवाईसेवा

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती; बुकिंग प्रक्रिया 20 सप्टेंबरपासून सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

सोलापूरकरांची हवाई सेवेची दीर्घ प्रतीक्षा संपली असून, येत्या १५ ऑक्टोबरपासून सोलापूर विमानतळावरून सोलापूर-मुंबई आणि सोलापूर-बेंगळुरू या दोन मार्गांवर नियमित प्रवासी विमानसेवा सुरू होणार आहे. त्यासाठीची बुकिंग प्रक्रिया आज, २० सप्टेंबरपासून सुरू होईल.

‘नवरात्रीच्या शुभमुहूर्तावर सोलापूरला मिळणारी ही दुहेरी भेट सुलभ, वेगवान आणि आधुनिक वाहतुकीकडे टाकलेले एक मोठे पाऊल आहे,’ अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

ही विमानसेवा मंगळवार, बुधवार, शुक्रवार आणि शनिवारी मिळेल. यामुळे सोलापूरकरांना राज्याची आर्थिक राजधानी मुंबई, तसेच दक्षिण भारतातील औद्योगिक केंद्र बेंगळुरूशी थेट आणि जलद हवाई संपर्क मिळणार आहे. व्यापारी, उद्योजक, विद्यार्थ्यांसह भाविकांचीही या नव्या सेवेमुळे प्रचंड सोय होणार आहे.

‘सोलापूर-मुंबई विमानसेवा सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हीजीएफ मंजूर केल्याने सोलापूर-मुंबई विमानसेवेचा मार्ग मोकळा झाला. मोदी सरकारच्या माध्यमातून या विमानतळाची निर्मिती केल्यानंतर प्रत्येक विमानसेवा सुरू करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू होते, ज्याला आता यश आले आहे. मुंबई आणि बेंगळुरू या दोन सेवा सुरू होणे, हा सोलापूरच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे,’ असे मोहोळ यांनी सांगितले.






**स्टार एअरच्या सेवेचे वेळापत्रक**

- सोलापूर-मुंबई : प्रस्थान : दुपारी १२.५५
- मुंबई-सोलापूर : प्रस्थान : दुपारी २.४५
- बेंगळुरू-सोलापूर : प्रस्थान : सकाळी ११.१०
- सोलापूर-बेंगळुरू : प्रस्थान : दुपारी ४.१५

‘सोलापूरसारख्या ऐतिहासिक, औद्योगिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहराला थेट मुंबई आणि बेंगळुरूशी जोडणे ही काळाची गरज होती. या हवाईसेवेमुळे सोलापूरकरांचा प्रवासाचा वेळ वाचणार आहेच, शिवाय या भागात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे,’ असा दावाही त्यांनी केला.